# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

### मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६/ फाल्गुन ५, १९४७ (शके)

**२०.** महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ (३) अन्वये मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता **श्री.राजेश तारवी, सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी यांच्या दालनात (कक्ष क्रमांक ११०१-ब, अकरावा मजला, विधान भवन, मुंबई)** येथे संगणकीय आज्ञावलीद्वारे अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम काढण्यात आला आहे. निदेशानुसार सदरहु ठराव **शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६** रोजी खालीलप्रमाणे चर्चेला घेण्यात येणार आहेत :-

**(मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) —**

(१) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २**

"मौजे कटगुण (ता.खटाव, जि. सातारा) या गावाला पर्यटनाचा "ब" दर्जा देऊन याठिकाणी असलेले राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले स्मारकाला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२) **डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७८**

"अधिवास (डोमासाईल) प्रमाणपत्र हे राज्याचे रहिवासी असल्याचे सिद्ध करणारा एक महत्त्वाचा आणि आवश्यक दस्तऐवज असून राज्यातील शिक्षण, शासकीय नोकऱ्या व विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी वापरण्यात येतो. सदर प्रमाणपत्र मिळणेसाठी किमान १५ वर्षे सलग वास्तव्य असल्यास दिले जात असणे, सन २०१० नंतर राज्यात स्थलांतरित झालेल्या नागरीकांना डोमासाईल मिळणार असून राज्यातील विविध योजनांचा लाभ घेण्यास अनेक परप्रांतीय पात्र ठरत असणे, परिणामी राज्यातील मूलनिवासी नागरिकांवर याचा मोठा परिणाम होत असणे, यावर आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(3) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७६**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".

(४) **श्री.संजय केणेकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २१**

" राज्यातील सर्वच महानगरपालिकामधील लोकसंख्येत होत असलेली वाढ, नव्याने होत असलेल्या वसाहती, त्यामुळे निर्माण होणा-या कच-याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, कचऱ्यावर योग्य प्रक्रिया होत नसल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर होत असलेला विपरित परिणाम, निर्माण होत असलेले प्रदुषणास आळा घालण्याकरिता राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया व

..२/-

कचरा व्यवस्थापन मंडळ स्थापन करण्यात यावे.अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे".

**(५) श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८०**

"राज्यातील उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध होत नाही, उद्योगांमध्ये भूमिपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरूणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या मिळत नसल्याने राज्यातील सुशिक्षित तरूणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".

**विधान भवन,** **डॉ.विलास आठवले**
मुंबई. सचिव - ३
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२६ महाराष्ट्र विधानपरिषद

**<u>याची प्रत</u> :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य
२) मा.सभापती, विधानपरिषद यांचे सचिव
३) मा.उप सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव - १, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव - २, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव - ३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव - ४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
९) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, विधान भवन, नागपूर
१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
११) संगणक कक्ष (संकेतस्थळ)
१२) एम.के.सी.एल.कक्ष (आज्ञावली)